बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९७४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक १९ | बुधवार, दि.१७ एप्रिल २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

गोंदिया-भंडारा मतदारसंघातील उमेदवारांमध्ये धाकधूक वाढली

आज प्रचार संपणार,१९ रोजी मतदान

अजित पवार गट भंडारा-गोंदियातच सक्रिय

विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला एकही जागा मिळाली नाही.त्यामुळे आतापर्यंतच्या प्रचारसभांना अजित पवार यांनी हजेरी लावली नाही.विदर्भात केवळ भंडारा-गोंदियात राष्ट्रवादीचा प्रभाव दिसून येतो.येथे प्रफुल्ल पटेल हे तळठोकून भाजप उमेदवारासाठी काम करीत आहेत.

काँग्रेसचा भर कॉर्नर सभा,बुथ कमिट्यांवर

काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या निवडणूक प्रचारासाठी महाविकास आघाडीने मोठ्या सभांऐवजी कॉर्नर सभा घेण्यावर आणि सर्व २२५५ बुथ कमिट्यांच्या भेटीवर २४ तासांत भर देण्याचे नियोजन आखले आहे.दोन्ही जिल्ह्यांत रामनवमीच्या उत्सवापुर्वीच सर्व तालुकास्तरावर दुचाकी रॅली काढल्या जाणार आहेत.. रामनवमी उत्सवातही सहभाग घेतला जाईल. गृहसंपर्क अभियानावर भर देण्यासाठी गावागावातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना गावात राहून जास्तीत-जास्त मतदारापर्यंत पोहोचण्यास सांगितले आहे.

भाजपचा घर चलो अभियानावर भर

महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारासाठी भाजपने शेवटच्या टप्यातही,सभा,पदयात्रा रॅली,घर चलो अभियानाच्या माध्यमातून डोअर टू डोअर पोहोचण्यावर भर दिला आहे.घर चलो अभियानाच्या माध्यमातून योजनांचा मिळालेल्या लाभार्थ्यांना नरेंद्र मोदी यांचे धन्यवाद पत्र दिले जाईल. बुथ कमिट्यांच्या माध्यमातून मतदारयादीचे वाचन करुन बाहेरगावी असणाऱ्या मतदारांचा आढावा घेतला जात आहे. गावागावात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

पराभव दिसताच मोठे नेते मैदानात,खासदार मेंढेंना शहा,नड्डाचा टेकू

गोंदिया : लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील पाच लोकसभा मतदारसंघातील प्रचार १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता संपणार आहे. यानंतर छुप्या बैठकांना जोर येईल. येथे महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत असून मतदारांचा कौल कुणाला, यावरून तर्क-वितर्क लावण्यात येत आहे. यंदाच्या निवडणुकीत महायुतीतील भाजप आणि महाविकास आघाडीतील काँग्रेसम ध्येच थेट लढत आहे. नागपुरात नितीन गडकरी विरुद्ध विकास ठाकरे, रामटेकात राजू पारवे विरुद्ध श्यामकुमार बर्वे, भंडारा-गोंदियात सुनील मेंढे विरुद्ध डॉ. प्रशांत पडोळे, गडचिरोली-चिमूरमध्ये अशोक नेते विरुद्ध नामदेव किरसान आणि चंद्रपुरात सुधीर मुनगंटीवार विरुद्ध प्रतिभा धानोरकर, अशी थेट लढत होत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीने आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे.

या निवडणुकीत विद्यमान विरुद्ध नवख्यांच्या सामन्यात कोण बाजी मारतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. १७ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्याचील प्रचार संपणार असून त्यानंतर छुप्या बैठकांवर सर्व पक्षांचा जोर राहील. विदर्भ हा काँग्रेसचाच गड मानला जायचा, कालांतराने भाजपने यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आता पूर्व विदर्भातील मतदार कोणाला कौल देणार, महायुती आपले वर्चस्व कायम राखणार की महाविकास आघाडीला पूर्व विदर्भात ङ्गअच्छे दिनफ येणार, याबाबत राजकीय वर्तुळासह मतदारांमध्ये विविध तर्क लावले जात आहेत.

गोंदिया-भंडारा लोकसभा संघात मतदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसतसे उमेदवार आणि नेत्यांच्या हृदयाची धडधड वाढताना दिसत आहे. अर्थात मतदानाचे कॉऊंट डाऊन सुरू झाल्याने प्रचाराचा धुराळा ही जोमात उडविला जात आहे. गेल्या २५ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर या मतदार संघात "कमळ' विरुद्ध "पंजा' अशी थेट लढत बघावयास मिळत आहे.

त्यातच दैनिक भाष्कर समुहाने केलेल्या सर्वेक्षणानुसार पहिल्या टप्यातील १० राज्यात काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला चांगले यश मिळत असून यामध्ये महाराष्ट्रातही आघाडीला ३९ जागा दाखवल्या गेल्या आहेत.यामध्ये विदर्भातील नागपूर वगळता सर्व जागा इंडिया आघाडीला दिसून येत आहेत.

गृहमंत्री अमित शहा आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याही सभा झाल्या. महाविकास आघाडीकडून काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भंडारा जिल्ह्यात तर पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी नागपुरात सभा घेतल्या. भाजपचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फफडणवीस, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, तर काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

बसपाचा गृहभेटीकडे अधिक कल

बसपाचे उमेदवार संजय कुंभलकर हे प्रत्यक्ष गृहभेटीवर भर देऊन मतदारांशी संपर्क साधत आहेत.यासोबतच पक्षाचे नेते अजाब शास्त्री यांच्या उपस्थितीत रोड शो शेवटच्य दिवशी केला जाणार आहे.मोबाईलवरुन सर्व मतदारांशी कॉलींग ॲपच्या माध्यमातून संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

काँग्रेसचा किल्ला नवखे असलेले डॉ. प्रशांत पडोळे लढवत असले तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे रिंगणात आहेत. उल्लेखनीय म्हणून भाजप ४०० पारचा नारा छातीठोकपणे लावत असली, तरी या मतदार संघात निष्क्रिय खासदारामुळे मतदारांपुढे नाक घासण्याची वेळ वरिष्ठ नेत्यांवर आल्याचे आल्याचे बोलले जात आहे.

भाजपला पराभव टप्प्यात दिसत असल्याने मोठे नेते मैदानात उतरविण्याशिवाय मार्गच उरला नाही. अगदी देशाच्या गृहमंत्र्यांपासून तर राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना भर उन्हात तापून निघावे लागत आहे.त्यातच देवेंद्र फडणवीसांना तर मतदारसंघातील सर्वच विधानसभानिहाय सभा घेण्याची वेळ आली.अशात चुकून भाजपचा विजय झालाच तर पुन्हा एकदा एक निष्क्रिय खासदार जनतेच्या बोकांडी बसविला जाणार, अशा चर्चा जोरात असून मोदी-शहाच्या नावावर गोंदिया-भंडाराकरांच्या गळ्यात एक धोंडा तर बांधला जाणार नाही ना, असा यक्षप्रश्न मतदारांना पडला आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभेची निवडणूक पहिल्या टप्प्यात अर्थात १९ एप्रिल रोजी होत आहे. महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार सुनील मेंढे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्यात चुरशीची लढत होईल, हे तितकेच खरे आहे. मात्र, गावागावांत खासदार मेंढे यांना होणारा विरोध पाहता भाजपला दिल्लीतल्या मोठ्या नेत्यांना भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात प्रचारासाठी मैदानात उतरावे लागले.

भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राची निवडणूक १९ एप्रिलला होणार आहे. १८ उमेदवार रिंगणात असले तरी खरी लढत महायुतीचे उमेदवार खासदार सुनील मेंढे व काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे यांच्यातच होणार आहे.तर बहुजन समाज पार्टिचे संजय कुंभलकर हे कितपत तिहेरी लढत करतात याकडेही लक्ष लागले आहे.त्यात दोघांचाही प्रचार जोमात सुरू असून आरोप-प्रत्यारोपाच्या फफैरी झाडल्या जात आहेत. त्यांच्या प्रचाराकडे किंबहुना आरोप-प्रत्यारोपाकडे कार्यकर्ते वगळता मतदारांना लक्ष देण्यात अजिबात वेळ नाही. यातही महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांना गावागावांत विरोध होत आहे. विकास दाखवा, असे म्हणत प्रचारापासून रोखत आहेत.

हा अनुभव एकट्या गोंदिया जिल्ह्यात नव्हे तर भंडारा जिल्ह्यातही त्यांना आला. प्रचार न करताच त्यांना परत जाण्याची नामुष्की ओढवली. खासदार मेंढेजी तुम्ही आलात, तसे परत जा, असे म्हणत गावकरी त्यांना अक्षरशः हाकलून लावत आहेत. मतदारसंघातून जवळपास २२ गावांत त्यांना परतून लावण्यात आले. त्यामुळे पराभवाच्या छायेत आलेल्या मेंढे यांना टेकू देण्यासाठी दिल्लीतल्या नेत्यांना भंडारा-गोंदिया मतदार संघात यावे लागले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी अशा मोठ्या नेत्यांनी सभा गाजवली. सभेत १०० ते २०० रुपये रोजी देऊन गर्दी करण्यास सांगण्यात आले होते. सर्कस ग्राउंडवर झालेल्या सभेत उपस्थित राहण्यासाठी आणि रॅलीत सहभागी होण्यासाठी केवळ १०० रुपये दिल्याचे काही महिलांनी सांगितले.

खासदार सुनील मेंढे यांच्या नशीबाला साथ म्हणजे उर्वरित १६ उमेदवार काँग्रेसची किती मते फोडतात, यावर सुद्धा भाजपच्या विजयाचे गृहीत धरले जात आहे.बसप व संविधान बचावचा नारा देणारी वंचित बहुजन आघाडी सुध्दा काँग्रेसच्या मताला सुरुंग लावण्यात किती यशस्वी होते, हे मतमोजणी नंतर समोर येईल.

इतर उमेदवार हे सुद्धा अप्रत्यक्षरीत्या भाजपलाच रसद पुरविणार असल्याचेही एकंदर चित्र आहे. परिणामी, एकूण १७ उमेदवारांचा सामना काँग्रेसचे डॉ. पडोळे कसा करतात, यावर सुद्धा खा. मेंढेंचा विजय अवलंबून आहे. भाजपमधील अंतर्गत नाराजीचा पुरेपुर लाभ पाहिजे तसा काँग्रेसला प्रचारातून घेता आले नसल्याचेही दिसून येत आहे.त्यातच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची एकांगी भूमिकेमूळे या मतदारसंघात राहुल गांधी वगळता काँग्रेसचा एकही वरिष्ठ नेता सभा घ्यायला पोचला नाही.त्यातच काँग्रेसने गोंदिया जिल्ह्यात प्रचारसभा नाकारल्याने त्याचाही फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यातच काँग्रेसच्या नेत्यांचे प्रामाणिक प्रयत्न यावर या मतदारसंघातील निकाल प्रभावीत होणार आहे.वास्तविक या निवडणुकीत २००४ च्या लोकसभा निवडणुकीसारखी परिस्थीती आहे.सर्वसामान्य उमेदवार व धनाढ्य उमेदवार अशी ही निवडणूक होती,तेच चित्र २०२४ च्या निवडणुकीत असून मतदारांनी हिंदू-मुस्लीम वाद व धर्माच्या नशेत मतदान टाळले,तर या मतदारसंघातील निकाल भाजपला धक्का देणारा ठरू शकते,हे मात्र नक्की.

भोपाल, शनिवार 13 अप्रैल, 2024 | चैत्र शुक्ल पक्ष- 5, 2081 | 12 राज्य | 61 संस्करण



राज्य	राजग	I.N.D.I.A.	अन्य
उत्तर प्रदेश	58	22	00
महाराष्ट्र	09	39	00
बिहार	06	34	00
पश्चिम बंगाल	03	04	35
गुजरात	23	03	00
तमिल नाडु	00	39	00
कर्नाटक	06	22	00
तेलंगाना	02	13	02
राजस्थान	15	10	00
केरल	00	20	00

दैनिक भास्कर महाभारत 2024
मेगा सर्वे 2024 दैनिक भास्कर नीलसन

भाजपच्या प्रचारात अपक्ष आमदारांने मारली बाजी!

गोंदिया - भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून सर्वच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रचारात स्वतःला झोकून दिले आहे. जिल्ह्यात भाजपचा प्रचार जोरात सुरू असून भाजपच्या वतीने मोठमोठे नेते प्रचारासाठी जिल्ह्यात येऊन गेले. मात्र गोंदिया येथे १६ एप्रिलला झालेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फफडणवीस यांच्या सभेत सर्व भाजप पदाधिकारी यांच्या नाकावर टिच्चून अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी प्रचारात बाजी मारल्याचे दिसत आहे.

विशेष म्हणजे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांची १२ एप्रिल रोजी येथील सर्कस मैदानावर सभा पार पडली.ही सभा भाजपचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या नेतृत्वात पार पडली.राष्ट्रीय अध्यक्षांच्या सभेला जी मतदारांची गर्दी असायला हवी होती,ती गर्दीच नसल्याने भाजप नेत्यामध्ये चांगलीच नाराजी बघावयास मिळाली होती.त्या सभेला नसलेली गर्दी आणि अपक्ष चाबी संघटनेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी टी.बी.हॉस्पीटलच्या मैदानावर घेतलेली फडणवीसांची सभा बघितल्यास विद्यमान अपक्ष आमदाराने माजी आमदारावर गर्दीच्या माध्यमातून मात दिल्याचे चित्र बघावयास मिळाले.

भंडारा - गोंदिया लोकसभा निवडणुकीत भाजपने विद्यमान खासदार सुनील मेंढे यांना पुन्हा तिकीट दिल्याने अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते नाराज आहेत. त्यामुळे की काय या मतदार संघात भाजपने सर्व स्टार प्रचारकांची फफौजच उभी केल्याचे जाणवत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,भाजप अध्यक्ष जे.पी.नड्डा,उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ,केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मंत्री विजय कुमार गावित,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदींनी मतदार संघात सभा घेतल्या. उपमुख्यमंत्री फफडणवीस यांनी तर मागील तीन दिवसांपासून मतदार संघात तळ ठोकला आहे. गोंदिया मतदार संघात माजी आमदार गोपालदास अग्रवाल, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नेतराम कटरे, जिल्हा परिषद सभापती संजय टेंभरे यांच्यासह सर्व भाजप पदाधिकारी यांनी प्रचाराचा धुराळा उडवून दिला आहे.

अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनीही भाजप उमेदवार सुनील मेंढे यांना आपला पाठिंबा दिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यासारख्या मोठ्या नेत्यांच्या सभेत मागील आठवड्यात प्रचारात काहीसे मागे पडलेले अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी मात्र उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेत भाजप च्या सर्व नेत्यांना पछाडत आजघडीला प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसत आहे.विशेष म्हणजे केंद्रीय नेत्यांच्या सभेपेक्षा उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेला गर्दी जास्त झाल्याने जिल्ह्यातील नेत्यांना फडणवीसच भाजपचे तारणहार असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या घरातूनच मोदींना घरचा आहेर

गोंदिया: पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राजवटीत कारभार सुरळीत नसून देश अधोगतीकडे निघाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे फक्त अर्थव्यवस्थेसह इतरही अनेक आघाड्यांवर अकार्यक्षम ठरले असल्याचा दावा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती डॉ. परकला प्रभाकर यांनी केला आहे. हे वृत्त दिल्लीच्या राजकीय वर्तुळात पसरल्यानंतर निर्मला सीतारामन यांनी आर्थिक परिस्थितीमुळे आपण निवडणूक लढवू शकत नाही, असे कारण देऊन निवडणुकीच्या रणांगणातून माघार घेतली आहे.

एका मुलाखतीत परकला प्रभाकर यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान मोदी अनेक बाबतींत अकार्यक्षम ठरले आहे. याचा अर्थ सर्वच बाबतीत ते अकार्यक्षम ठरले नसून काही त्यांचे निर्णय मनाला भावतात देखील. समाजात फूट पाडणे, जातीय विद्वेष निर्माण होईल, असे वातावरण तयार करणे याबाबत ते कार्यक्षम असल्याचे सांगून खळबळ उडवून दिली आहे. देशात चाललेल्या चुकीच्या अनेक घटनांबाबत प्रभाकर यांनी सडेतोड आपले मत व्यक्त केले आहे. देशाच्या सद्य परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करून आपला देशच चिंताजनक परिस्थितीतून जात असल्याचा दावा केला. याबाबत मोदींना पर्याय लोकचं ठरवतील. मात्र देशात जे जे चुकीचे सुरू आहे, ते लोकांसमोर मांडणे आपले कर्तव्य असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

सरकारचे प्रतिनिधी किंवा मंत्री हे चुकीची माहिती लोकांसमोर ठेवत असल्याचा दावाही त्यांनी केला. तीन वर्षापूर्वीचा आपला जीडीपी आणि आजच्या जीडीपीमध्ये खूप अंतर आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. आपण चुकीची धोरणे अवलंबली आहेत, असे सांगून ते म्हणतात की, भारतीय जनता पार्टीकडे सुरुवातीपासून आर्थिक तत्त्व-ज्ञान किंवा तसा सुसंगत विचार कधीच नव्हता. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत भारत सध्या संकटाचा सामना करत आहे. आज मोदी सरकारला कोणते अर्थतज्ज्ञ सल्ला देत आहेत, याची आपल्याला कल्पना नाही, असे सांगून त्यांचा निशाणा कोणाकडे गेला, हे समजल्याने दिल्लीच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. देशात असलेल्या अनेक बरे वाईट गोष्टींना मोदी जबाबदार असल्याचेही त्यांनी सांगितले. कारण महागाईचा दर सहा ते सात टक्क्यांच्या घरात, तर बेरोजगारीचा दर सात टक्क्यांच्या वर गेल्याचा दावाही त्यांनी केला.?

भारतीय जनता पक्षाने ४०० पारचा नारा दिलेला असतांना प्रभाकर यांचे विधान खळबळ उडविणारे ठरले आहे. विरोधक नेहमी भाजपने ही निवडणूक झाल्यानंतर पुन्हा या देशात निवडणूक होणार नाही, असे दावे करतात. त्यालाही प्रभाकर यांनी पुष्टी दिली आहे. विशेष म्हणजे आता जे मणिपूरमध्ये होत आहे. उद्या ते आपल्या परिसरातही होऊ शकते. तशी परिस्थिती संपूर्ण देशात होईल, असे गंभीर विधानही त्यांनी केले. इंदिरा गांधी नंतर देशाचे अर्थमंत्रीपद सांभाळणाऱ्या निर्मला सीतारामन यांनी सलग पाच वर्षे अर्थसंकल्प सादर केला. मोदींच्या विश्वासातील नेत्या म्हणूनही त्यांचे नाव घेतले जाते. परंतु आता त्यांच्या घरातूनच पतीराजाकडून मोदींना घरचा आहेर दिल्यामुळे राजकीय वर्तुळात याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहे.

२० पटसंख्येच्या आतील १८५ शाळांचे होणार बंद, नजीकच्या शाळेत समायोजन

गोंदिया : कमी पटसंख्या असलेल्या १८५ शाळांना कुलूप लावण्याचे संकेत शासनाच्या वतीने पाच वर्षांपूर्वी देण्यात आले होते. जिल्हा आदिवासी व नक्षलग्रस्त असून, या जिल्ह्यातील अनेक शाळा दुर्गम भागात आहेत. या दुर्गम भागातील शाळा पटसंख्येअभावी बंद होण्याच्या मार्गावर होत्या. या शाळांना कुलूप लागण्याची भीती विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांनाही सतावत होती. परंतु, आता या शाळा बंद होणार नाहीत, या शाळांचे समायोजन नजीकच्या शाळांत करण्याचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी एम. रंगनाथन यांनी काढले आहे.

कमी पटसंख्या असलेल्या जवळ जवळच्या दोन तीन शाळा एकत्र आणून समूह शाळा चालविण्याचा सरकारचा मानस असला तरी गोंदिया जिल्ह्यातील फफक्त एकाच समूह शाळेचा प्रस्ताव शासनाला गेला आहे.

एकूण विद्यार्थी- २,३५,७०३
संचमान्यतेनुसार मंजूर शिक्षक- ४,२६०
महिला शिक्षक- ९५५
भरलेली पदे- ३,५९६
रिक्त पदे- ६६४

जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आमगाव: २४, अर्जुनी-मोरगाव: १७, देवरी: ४०, गोंदिया: २२, गोरेगाव २४ , सडक-अर्जुनी: १८, सालेकसा: २६, तिरोडा२४ इतक्या शाळा बंद होणार आहेत.

जिल्ह्यातील पदवीधर शिक्षकांची ९४३ पदे मंजूर असताना त्यातील ७७३ जागा भरल्या आहेत, तर १८० जागा रिक्त आहेत.

तसेच १३ पदवीधर शिक्षक अतिरक्त आहेत. जिल्ह्यातील २१० शाळांमध्ये महिला शिक्षक कार्यरत नाहीत. गोंदिया जिल्ह्यातील सहायक शिक्षकांची २,७८९ पदे मंजूर असताना त्यातील २,५९६ जागा भरलेल्या आहेत, तर १९३ जागा रिक्त आहेत. तसेच २७ सहायक शिक्षक अतिरिक्त आहेत.

शिक्षकांची कमतरता कुणाची जबाबदारी

शिक्षण विभाग कमी पटसंख्येच्या शाळांचे समायोजन करण्याचा निर्णय घेत आहे. त्याची अंमलबजावणी जिल्ह्यात सुरु झाली. जिल्ह्यातील अनेक शाळांत शिक्षकांची पदे कमी होती. त्यामुळे अनेक पालकांनी आपल्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये यासाठी दुसऱ्या शाळेत पाठविले. अशात आता सीईओ यांनी गावातील मराठी शाळाच बंद करण्याचा निर्णय घेतला. मग त्या शाळांत शिक्षकांची पदे भरण्याची जबाबदारी नेमकी कुणाची, असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

९ शिक्षक कार्यालयाच्या दावणीला

जिल्हा परिषदेकडे कार्यालयीन कर्मचाऱ्यांची कमतरता नाही. आता परीक्षांचा काळ आहे. त्यातच शिक्षकांची सेवा निवडणुकीसाठी घेण्यात आली आहे. या काळात देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गोंदिया जिल्ह्यातील ९ शिक्षकांची सेवा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात घेतली आहे. त्या शिक्षकांना चटोपाध्याय निवडणश्रेणीचे काम देण्यात येणार आहे.

संपादकीय

मतदान हा महत्त्वाचा अधिकार

मतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली आणि आपण ही पद्धती अजूनही टिकवून ठेवली आहे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला दिले आहेत. दर पाच वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी बजाविलेल्या मतदानाच्या अधिकारातून केंद्रात शासन स्थापन होते. येथे चांगली माणसे/राज्यकर्ते असावेत, असे एक सुजाण नागरिक म्हणून आपल्याला वाटत असेल, तर कोणतीही सबब न सांगता प्रत्येकाने मतदान करावे.

चांगले राज्यकर्ते निवडून येण्यासाठी आपल्या प्रत्येकाचे एकेक मत महत्त्वाचे आहे. ते देशातील लोकशाहीच्या भवितव्यासाठी आणि आपल्या पुढील पिढीसाठीही खूप गरजेचे आहे. त्यामुळे मतदान टाळू नये. मतदानाच्या माध्यमातून देशातील नागरिकांना देशात कसा बदल हवा आहे, त्यांना कसे राज्यकर्ते हवे आहेत हे कळते. त्या दृष्टीनेही मतदान महत्त्वपूर्ण आहे.

आपण कोण आहोत, आपल्याला जीवनात काय हवे आहे ते ठरविण्यासाठीही मतदानाची मदत होऊशकते, कारण मतदानाच्या माध्यमातून राज्यकर्ते निवडले जातात आणि योग्य व चांगले राज्यकर्ते निवडून दिले तर आपल्याला जे हवे आहे, त्या अपेक्षा ते पूर्ण करू शकतात, पण त्यासाठी प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे.

भारतीय राज्यघटनेने या देशातील नागरिकांना निवडणुकीत मतदानाचा एक फार महत्त्वपूर्ण अधिकार प्रदान केला आहे. स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत, उच्च, नीच असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता राज्यघटना लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाच्या मताचे समान मूल्य मानले. समानतेचे हे एक फ्फार महत्त्वाचे सूत्र घटनेद्वारे भारतातील प्रत्येकाला मिळाले आहे, त्याचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मतदान हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे याचे भान आल्याशिवाय जगातील सर्वात मोठी असलेली आपली लोकशाही सुदृढ होणार नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे. आपण प्रत्येक जण सरकारकडून जशा काही अपेक्षा करत असतो, त्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी आपणही मतदान करणे हे कर्तव्य ठरते. लोकशाहीने दिलेला हा अधिकार बजावणे म्हणूनच अतिशय महत्त्वाचे आहे. आपण एकट्याने मत न दिल्याने असा काय मोठा फरक पडणार आहे, असा विचार करणारेही या देशात बरेच जण असतात. पण असा विचार आत्मघातकी असतो. आपल्या एका मतानेही फ्फरक पडू शकतो, हे लक्षात घेतले, तर मतदानाचे खरे मूल्य लक्षात येऊ शकेल. आपल्याला जो पक्ष किंवा उमेदवार महत्त्वाचा वाटतो, त्या पक्षाला मत देणे म्हणजे आपण ज्या विचारांवर विश्वास ठेवतो, त्याला आधार देण्यासारखे असते. मत दिल्याशिवाय या देशात परिवर्तन अशक्य आहे, याची जाणीव ठेवली, तर हे सरकार नको होते, असे घडले त्याला हेच सरकार कारणीभूत आहे अशा चर्चांना पूर्णविराम मिळेल. सरकारकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त करण्याची मतदान ही एक संधी असते. कोणत्या प्रकारचे सरकार आपल्याला हवे आहे, हे सांगण्याचे ते एक निमित्त असते. म्हणून मतदानाच्या दिवशी सहलीला जाणे किंवा मतदानालाच न जाणे अतिशय चुकीचे आहे. सशक्त लोकशाही हवी असेल, तर मतदानाशिवाय पर्याय नाही. नागरिक सजग असल्याचे ते एक द्योतक असते. मतदान हा एक मौल्यवान अधिकार आहे. त्याचे मूल्य करून कुणी आपल्याला विकत घेऊ पाहत असेल, तर त्याच्या प्रलोभनांना बळी पडणे म्हणजे या अधिकाराचा घोर अपमान आहे, असे मला वाटते. आश्वासने आणि प्रलोभनांपासून दूर राहून लोकशाही निकोप करण्याच्या प्रयत्नात प्रत्येकाने सहभागी होणे त्यासाठी अतिशय आवश्यक आहे.

कुलरचा वापर सावधगिरीने करून मृत्यूला थांबवा

नागपूर:- नागपूरसह संपूर्ण विदर्भात उन्हाची दाहकता दिवसेंदिवस वाढत आहे, तापमानाचा पारा सातत्याने वर-वर जात आहे. या वाढत्या तापमानाची दाहकता कमी करण्यासाठी घरोघरी व कार्यालयांतून कुलरचा वापर सुरु होत आहे. कुलर वापर करतेवेळी काही शुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याने आणि योग्य खबरदारी न घेतल्यास आपल्या घरातील कुलर मृत्यूचे कारण बनू शकते. गेल्या काही वर्षांमध्ये कूलरचा करंट लागून अनेकांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अशा घटना टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणतफ्फे करण्यात आले आहे.

... तर वाचू शकतो जीव!

कूलर लावण्यापूर्वी घरातील अर्थिंग सक्षम असल्याची चाचणी अधिकृत कंत्राटदार किंवा इलेक्ट्रिशियनकडून करून घ्यावी, अर्थिंग व्यवस्था योग्य नसल्याने अशा घटना घडतात. याशिवाय बाजारात आयएसआय मार्क नसलेले ङ्गलोकलफ कूलर विक्रीला आहेत. अशा कूलरमुळेही विजेचा शॉक लागण्याचा धोका आहे. विजेचा धक्का हा जीवघेणा असतो. पण, पुरेशी खबरदारी घेतली तर विजेच्या धक्क्यामुळे होणारा मृत्यू टाळता येऊ शकतो, घरात अर्थ लिकेज सर्किट ब्रेक (ईएलसीबी) हे उपकरण बसविले तर जीव वाचू शकतो. हे उपकरण असल्यास अपघाताच्यावेळी वीजपुरवठा खंडित होतो व जीव वाचतो. कूलरचा वापर करतेवेळी पुढिलप्रमाणे काळजी घेण्याचे आवाहन देखील महावितरणने केले आहे.

अशी घ्या काळजी...

●कूलरच्या बॉडीला अर्थिंग जोडलेली आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्या.

कूलरची वायरिंग योग्य आणि त्रुटीमुक्त असल्याची खात्री करा.

●कूलरचा स्विच बंद करून व प्लग सॉकेटमधून बाहेर काढून पाणी भरावे.

●घरातील वीजसंच मांडणीला ई.एल.सी.बी. किंवा आर.सी.सी.बी. ही उपकरणे जोडण्यात यावी.

●कूलर सुरू असताना त्यात करंट येत असल्याचे लक्षात आल्यास तो त्वरित बंद करून त्याची चाचणी करूनच पुन्हा लावावा किंवा अशा नादुरुस्त कूलरचा उपयोग करू नये.

●ओल्या हाताने कुलर हाताळु नका.

●कूलरच्या सानिध्यात कुणी व्यक्तीला विजेचा धक्का लागल्यास त्या व्यक्तीस हात लावू नये.

●कोरड्या लाकडी रॉडने त्या व्यक्तीस कूलरपासून वेगळे करावे व त्वरित वैद्यकीय उपचाराकरिता डॉक्टरकडे पाठवावे.

●जोड असलेल्या वायरने कूलरला वीजपुरवठा देण्यात येऊ नये. त्याकरिता अखंड वायर वापरण्यात यावा.

●कूलर चालू करण्यापूर्वी, पॉवर कॉर्ड आणि प्लग मध्ये कोणतीही खराब झालेली भाग नाही याची खात्री करा.

●कूलरला नेहमी एका स्वतंत्र पॉवर सॉकेटवर लावा.

●कधीही एकाच सॉकेटवर अनेक उपकरणे चालू करू नका.

●लहान मुलांना कूलरपासून दूर ठेवा.

●पावसाळ्यात कूलर वापरणे टाळा

●कूलरची नियमितपणे तपासणी करून दुरुस्ती करून घ्या.

●कूलरची नियमितपणे देखभाल करा.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

...तर प्रकाश आंबेडकर हिरो झाले असते!

ॲड.प्रकाश आंबेडकर हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अतिशय महत्त्वाचे आणि अभ्यासू नेते आहेत. पक्षाकडे एकही आमदार आणि खासदार नसलेले परंतु वर्षभर मेन स्ट्रीम मीडियामध्ये फ्रंट लाईनवर राहणारे कदाचित ते एकमेव नेते असावे. ज्यांच्याकडे अनेक आमदार, खासदार आहे त्यांनाही मीडियामधे जी स्पेस मिळत नाही तेवढी स्पेस मीडियामध्ये मिळवणारे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एकमेव नेते असावे. प्रकाश आंबेडकर म्हणजे महाराष्ट्राचे राजकारण आपल्या भोवती फिरवणारा एक अभ्यासक आणि विचारवंत राजकारणी. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात हिरो होण्याची चालून आलेली संधी स्वतःच्या हाताने त्यांनी गमावली. महाराष्ट्राच्या लोकांच्या हृदयात त्यांनी चांगली जागा निर्माण केली होती परंतु आता त्या जागेला धक्का बसलेला आहे हेही तेवढेच खरे आहे. अति महत्त्वाकांक्षा आणि आपल्या एवढे राजकीय ज्ञान आणि अभ्यास कोणालाच नाही अशा अविर्भावात ते वागत असल्यामुळे भविष्यात रामदास आठवले आणि जोगेंद्र कवाडे यांच्यासारखी त्यांची अवस्था होऊ नये असे आम्हाला वाटते. वस्तुस्थिती समजून न घेता, कार्यकर्त्यांचे, अभ्यासकांचे ऐकून न घेता, स्वतःच्याच मनाने निर्णय घेत असल्यामुळे राजकारणात चांगले यश मिळवण्याची क्षमता असूनही आतापर्यंत त्यांना फ्फारसे यश मिळाले नाही.त्यामुळे यापुढे तरी त्यांनी जनतेचा कानोसा घेऊन निर्णय घेतले तरच राजकारणात त्यांना चांगले दिवस येऊ शकतात.

अनेकदा रक्ताच्या वारसांपेक्षा विचारांचे वारस महापुरुषांचा विचार जास्त ताकदीने तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करीत असतात.देशात होऊन गेलेल्या अनेक महापुरुषांच्या बाबतीत आजही ते घडत आहे. ॲड.प्रकाश आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रक्ताचे वारस आहे.त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे लोक त्यांचा सन्मान करतात. बाबासाहेबांसोबत रक्ताची नाळ जुळलेली असल्यामुळे सर्वच जातीधर्मातील लोकांना त्यांच्याविषयी आपुलकी आणि आदर आहे. परंतु आपल्या देशात बाबासाहेबांच्या रक्ताच्या वारसांपेक्षा, त्यांच्या विचारांचे वारसदार बाबासाहेबांच्या विचारांचे रक्षण करण्यासाठी अहोरात्र झटत असतात हे सुद्धा एक वास्तव आहे. त्यामुळे आंबेडकर कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने मीच केवळ बाबासाहेबांचा खरा वारस आहे असे समजू नये. सध्या आपला देश हुकूम शाहीकडे वाटचाल करीत आहे. संविधान आणि लोकशाही धोक्यात येण्याची चिन्हे निर्माण झालेली आहे. असे देशातील बहुतांश लोकांप्रमाणेच प्रकाश आंबेडकरांचे सुद्धा मत आहे. अशावेळी या राजकीय संकटाचा एकजुटीने सामना करण्यासाठी काही राजकीय पक्ष एकत्र येत असतील आणि त्यामध्ये प्रकाश आंबेडकरांनी सुद्धा सन्मानाने सहभागी व्हावे अशी ते राजकीय पक्ष आणि पुरोगामी सामाजिक संघटनांची सुद्धा इच्छा असेल तर प्रकाश आंबेडकरांनी फ्फार ताणून धरण्याचे कारण नव्हते असे सर्वसामान्य लोकांना वाटणे काही गैर नाही.

महाविकास आघाडीने प्रकाश आंबेडकरांना पक्षाच्या ताकदीनुसार जागा सुद्धा दिल्या होत्या.परंतु नेहमीप्रमाणेच आपल्या मित्र पक्षांना शेवटच्या क्षणापर्यंत झुलवत ठेवण्याची प्रकाश आंबेडकरांची जी सवय आहे, त्यानुसार या वेळीही त्यांनी तेच केले. त्यामुळे प्रकाश आंबेडकरांच्या बद्दल लोकांच्या मनात असलेला आदर दिवसेंदिवस कमी होत आहे हे प्रकाश आंबेडकरांना जरी मान्य नसले तरी ती वस्तुस्थिती आहे हे लक्षात घेतले पाहिजे.भारतीय जनता पार्टीच्या विरोधात प्रकाश आंबेडकर हे सातत्याने बोलत असतात.आरएसएस वर ही त्यांची नेहमी टीका सुरू असते. असे असताना त्यांची स्वतःची भूमिका मात्र अनेकदा भाजप आणि आरएसएसला पूरक राहिल्याची अनेक उदाहरणे आपल्याला दाखवता येतील. त्यामुळेच प्रकाश आंबेडकरांना जवळून ओळखणारे जे जाणकार लोक आहेत ते आधीपासूनच खात्रीने सांगत होते की, काहीही झाले तरी प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडी सोबत युती करणार नाही.संविधान आणि लोकशाही वाचविण्याबद्दल जरी ते आपल्या भाषणातून जोरजोरात सांगत असले तरी त्यांना अंतरबाह्य ओळखणाऱ्या लोकांचा त्यांच्याबद्दलचा अभ्यास इतका खात्रीलायक आहे की, ते महाविकास आघाडी सोबत युतीच करणार नाही असे जाणकारांचे मत होते आणि ते सत्यात उतरले आहे. आता लोकांमध्ये प्रकाश आंबेडकरांच्या विरोधात वातावरण निर्माण व्हायला सुरुवात झालेली असताना सात ठिकाणी आम्ही काँग्रेसच्या उमेदवारांचे समर्थन करू अशी सारवासारवीची भूमिका त्यांनी घेतलेली आहे. परंतु लोकांना जे समजायचे आहे ते समजून चुकले आहे. प्रकाश आंबेडकरांना अत्यंत जवळून ओळखणारा त्यांचा एक कार्यकर्ता तर असा म्हणाला की, प्रकाश आंबेडकरांना अकोला जिल्हा परिषदेशिवाय दुसऱ्या कशातच रस नाही. पाच वर्ष आपले राजकारण आर्थिकदृष्ट्या व्यवस्थित चालले पाहिजे हा विचार करून ते वाटचाल करीत असतात.त्यांच्या या राजकारणाचा भाजपला फ्फायदा होतो यावर मात्र बहुतांश लोकांचे एकमत आहे.

अनेकदा आपल्या ताकतीपेक्षा अवास्तव जागांची मागणी करून मित्रपक्षांना झुलवत ठेवायचे आणि शेवटी आमच्या मागणीप्रमाणे आम्हाला जागा मिळत नाही त्यामुळे आमचा अपमान होतो असे जाहीर करून स्वतःची माणसे उभी करायची हा प्रकाश आंबेडकरांचा फ्फंडा आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकरांवर निर्विवादपणे विश्वास ठेवायला राजकीय पक्ष तर सोडा पण सामान्य माणूस सुद्धा तयार नाही. सामान्य लोकांच्या चर्चेत प्रकाश आंबेडकर हे विश्वासार्ह नेते नाही असे सातत्याने बोलले जाते हे कटू असले तरी सत्य आहे.मध्यंतरीच्या काळात त्यांनी घेतलेल्या काही सामाजिक भूमिकांमुळे त्यांची प्रतिमा चांगली निर्माण झाली होती. महाराष्ट्राच्या सोशल इंजिनिअरिंग मध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे हे कोणीही नाकारू शकत नाही.परंतु ते धरसोडीची भूमिका घेत असल्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवणे लोकांना कठीण जाते. या लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीमध्ये यावे व देशाला वाचवण्याच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका निभवावी यासाठी इंडिया आघाडीतील अनेक मोठ्या नेत्यांनी प्रयत्न केले होते.परंतु प्रकाश आंबेडकरांच्या अटी इतक्या अव्यवहार्य असतात की त्या पूर्ण करणे कोणत्याही राजकीय पक्षाला शक्य नसते. या अटी सुद्धा ते मुद्दाम निर्माण करतात. जेणेकरून आपली मागणी फेटाळल्या जाईल आणि आपण स्वतंत्रपणे उमेदवार उभे करू शकू व याचा फ्फायदा नेहमीप्रमाणे भाजपाला होईल. जनमानसामध्ये सर्वत्र हीच चर्चा आहे.या निवडणुकीत त्यांना हिरो बनण्याची संधी चालून आली होती आणि याचा फ्फायदा त्यांना विधानसभेत सुद्धा खूप झाला असता. लोकसभेत त्यांचे तीन-चार खासदार व विधानसभेत पंधरा-वीस आमदार सहज गेले असते आणि ते महाराष्ट्राच्या राजकारणात किंग मेकर बनले असते.देशाच्या सर्वात महत्त्वाच्या राज्यात राजकीय हिरो बनण्याची संधी त्यांनी स्वतःहून गमावली याचे दुःख वाटते.

त्यांचे वागणे जर असेच सुरू राहिले तर लोक त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही आणि रामदास आठवले सारखी त्यांची अवस्था होईल.पण त्यामुळे चळवळीचे खूप नुकसान होईल. आंबेडकरी चळवळीला कमजोर करण्यासाठी जरी काही लोक इतरांना नावे ठेवत असली तरी आंबेडकरी चळवळ खिळखिळी करण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील नेते आणि त्यांच्यातील आपसी मतभेद व अहंकार हीच कारणे जास्त कारणीभूत आहे हे वास्तव आहे. आंबेडकरी चळवळीतील राजकीय नेतृत्व जवळपास संपुष्टात आलेले असताना प्रकाश आंबेडकर यांच्याकडून चळवळीला मोठी आशा निर्माण झाली होती. परंतु त्यांच्या या अपरिपक्व भूमिकेमुळे त्यांचे अनेक सहकारी त्यांना सोडून गेले.

भविष्यात आंबेडकरी चळवळ ही फक्त सर्वसामान्य लोकांच्या भरवशावरच जिवंत राहणार आहे. त्यात आपल्याला कोणताही मोठा नेता दिसणार नाही एवढे मात्र नक्की. त्यामुळे प्रकाश आंबेडकरांनी आता तरी आपली अडेलतट्टू भूमिका सोडून सामंजस्याची आणि व्यवहारी भूमिका घ्यावी.केवळ मला संविधान आणि लोकशाही वाचवायची आहे असा जप करण्यापेक्षा, संविधान आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी जे लोक जीवापाड संघर्ष करीत आहे त्यांच्यासोबत मनापासून सहभागी होणे हीच त्यांच्यासाठी आणि देशासाठी सुद्धा सध्याची नितांत आवश्यकता आहे.

प्रेमकुमार बोके,
अंजनगाव सुर्जी

"या" विद्यार्थ्यांना मिळणार ६० हजार रुपयांची आर्थिक मदत,कोणाला मिळणार लाभ ?

गोंदिया: केंद्र शासनाच्या माध्यमातून तथा राज्य शासनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. शासन विद्यार्थ्यांसाठी देखील नेहमीच वेगवेगळ्या योजना सुरू करत असते. महाराष्ट्र राज्य शासनाने देखील राज्यातील विद्यार्थ्यांना कोणत्याही आर्थिक अडचणी विना त्यांना शिक्षण घेता यावे यासाठी अनेक कौतुकास्पद योजना चालवत आहे.

अनेक शिष्यवृत्तीच्या योजना राज्य शासनाने सुरू केलेल्या आहेत. दरम्यान महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजना नावाची एक नवीन योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील काही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जात आहे.

या अंतर्गत विद्यार्थ्यांना तब्बल ६० हजार रुपयांपर्यंतची मदत पुरवली जात आहे. अशा परिस्थितीत, आज आपण ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजना नेमकी काय आहे, या योजनेअंतर्गत कोणत्या विद्यार्थ्यांना फ्फायदा मिळतो, या योजनेचे स्वरूप कसे आहे याविषयी अगदी थोडक्यात माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजनेचे स्वरूप

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबवली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. या योजनेतून पात्र विद्यार्थ्यांना कमाल ६० हजार रुपयांची मदत मिळते. विद्यार्थ्यांना दिली जाणारी ही मदत शिष्यवृत्तीच्या स्वरूपात मिळणार आहे. या अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना भोजन भत्ता, गृहनिर्माण भत्ता, राहणीमान भत्ता असे भत्ते दिले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

या शहरात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार ६० हजार

या योजनेच्या माध्यमातून पुणे, पिंपरी चिंचवड, मुंबई, मुंबई उपनगर, नागपूर, ठाणे अशा शहरांमध्ये उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भोजन भत्ता ३२०००, निवासी खर्च २०००० आणि उदरनिर्वाह भत्ता ८००० असे एकूण ६० हजार रुपये मिळणार आहेत.

जे विद्यार्थी नगरपालिका क्षेत्रात उच्च शिक्षण घेत असतील आणि या योजनेसाठी पात्र ठरतील त्यांना भोजन भत्ता २८ हजार रुपये, निवासी भत्ता १५००० रुपये आणि उदरनिर्वाह भत्ता ८००० रुपये असे एकूण ५१ हजार रुपये मिळणार आहेत. जिल्हा किंवा तालुक्याच्या गावाला उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत भोजन भत्ता २५०००, निवासी भत्ता १२००० आणि उदरनिर्वाह भत्ता ६००० असे एकूण ४३ हजार रुपये मिळणार आहेत.

योजनेचा फायदा कोणाला मिळणार?

अदर बॅकवर्ड क्लासेस म्हणजेच ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. याशिवाय एस सी आणि एसटी कॅटेगिरी मधील विद्यार्थ्यांना देखील याचा लाभ मिळणार आहे. या योजनेचा लाभ फक्त अभ्यासासाठी शहराबाहेरील वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. याचा सर्वच विद्यार्थ्यांना फ्फायदा होणार नाही, तर विद्यार्थ्यांना मिरीटनुसार फ्फायदा मिळणार आहे. म्हणजेच जे विद्यार्थी शैक्षणिक अभ्यासक्रमात चांगले गुण मिळवतील अशा मेरिटच्या विद्यार्थ्यांना याचा फ्फायदा होणार आहे.

किती विद्यार्थ्यांना फायदा मिळणार

या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत राज्यातील २१ हजार ६०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा प्लॅन राज्य शासनाने आखला आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील फक्त सहाशे विद्यार्थी या शिष्यवृत्ती योजनेसाठी निवडले जाणार आहेत. म्हणजेच एका जिल्ह्यातील सहाशे विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होऊ शकणार आहे. यामुळे या योजनेचा लाभ मेरिटनुसार दिला जाणार आहे. ज्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमात चांगले गुण मिळतील त्यांनाच या योजनेचा फायदा मिळू शकणार आहे.

उपविभागाच्या सीमेत राहण्यास मनाई,जिल्ह्यात कलम १४४ लागू

गोंदिया, : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. त्यानुसार भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे व ४ जून २०२४ रोजी भंडारा येथे मतमोजणी होणार असून त्याअनुषंगाने जिल्ह्यात कलम १४४ लागू करण्यात आली आहे.

लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १२६ अंतर्गत मतदानाच्या दिवसापासून ४८ तास पूर्व प्रचार कार्यक्रम संपणार आहे. त्यानुसार ६३-अर्जुनी मोरगाव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया व ६६-आमगाव विधानसभा मतदार संघातील मतदार नसलेले सर्व राजकीय पदाधिकारी, पक्ष कार्यकर्ते, प्रचाराची धुरा सांभाळणारे सर्व व्यक्ती व प्रचाराकरीता आलेले सर्व स्टार प्रचारक हे निवडणूक प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर लोकसभा मतदारसंघात राहिल्यास त्यांचेकडून प्रचार मोहीम राबविली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गोंदिया पर्वणी पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तिरोडा पूजा गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देवरी कविता गायकवाड व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अर्जुनी मोरगाव वरुणकुमार सहारे यांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन फ्फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील प्रमाणे प्रतिबंध आदेश पारीत केला आहे.

६४-तिरोडा व ६५-गोंदिया विधानसभा मतदारसंघात मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजे १७ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजेपासून आणि ६३-अर्जुनी मोरगाव व ६६-आमगाव विधानसभा मतदारसंघात मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजे १७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपासून विधानसभा मतदारसंघातील उमेदवार नसलेले सर्व राजकीय पदाधिकारी, पक्ष कार्यकर्ते, प्रचाराची धुरा सांभाळणारे सर्व संबंधित व्यक्ती तसेच निवडणूक प्रचार कार्यक्रमासाठी आलेले सर्व राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक यांना उपविभागाच्या सीमेत राहण्यास मनाई करण्यात येत आहे.

तसेच पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र जमण्यास मनाई असेल. परंतु ही अट दारोदारी निवडणूक प्रचार करण्यासाठी किंवा घरोघरी भेटीकरीता लागु राहणार नाही.

मतदान संपण्याच्या ४८ तासामध्ये ध्वनीक्षेपणाच्या वापरावर पुर्णत: बंदी राहील याची संबंधितांनी नोंद घ्यावी. याबाबत सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांनी कलम १४४ ची अधिसूचना जारी केली आहे.

कामगारांना मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी

गोंदिया : महाराष्ट्र शासनाचे उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय ५ एप्रिल २०२४ अन्वये सर्व दुकाने, आस्थापना, व्यापारी संस्था, हॉटेल, रेस्टारेंट, नाट्यगृहे, औद्योगिक उपक्रम, कारखाने किंवा इतर व्यापारी आस्थापना व्यवस्थापक मालकांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरित्या बजावता यावा यासाठी पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे. राज्यात तसेच महाराष्ट्र राज्याच्या सिमेलगतच्या भागातील निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी व कर्मचारी यांना, मग ते कामानिमीत्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

भंडारा जिल्ह्यात ६ लक्ष ५ हजार मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप

भंडारा : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा ज्वर चांगलाच चढला आहे. ११ - भंडारा -गोंदिया लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होणार असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे ध्येय जिल्हा प्रशासनाने ठेवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून ङ्गमतदार माहिती चिठ्ठीफ चे वाटप प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी ९ लक्ष ९६ हजार ९२३ ङ्गमतदार माहिती चिठ्ठीफ उपलब्ध झाल्या असून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सदर चिठ्ठी पोहचविण्यात येणार आहे.

विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार माहिती चिठ्ठी चे वाटप: भंडारा जिल्ह्यासाठी एकूण ९ लक्ष ९६ हजार ९२३ मतदार माहिती चिठ्ठी उपलब्ध झाल्या असून यापैकी ६ लक्ष ५ हजार ३१५ चिठ्ठ्या विधानसभा मतदारसंघात वाटप करण्यात आले आहे. तसेच तुमसर विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९३ हजार ४०१ , भंडारा विधानसभा मतदारसंघात २ लक्ष १८ हजार ४४८, साकोली मतदारसंघात १ लक्ष ९३ हजार, ४६६ चिठ्ठ्या देण्यात आल्या असून तुमसर विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९ हजार ७९४, भंडारा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ५१ हजार ५०५,व साकोली विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ३० हजार ३०९, मतदार माहिती चिठ्ठी वाटप करणे बाकी आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून आता बी.एल.ओ. माफत घरोघरी मतदार माहिती चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात येत आहे. उर्वरीत ३ लक्ष ९१ हजार ६०८ मतदार माहिती चिठ्ठी १६ एप्रिल, २०२४ पर्यंत वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात असल्यांचे नोडल अधिकारी तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी सुभाष कापगते यांनी कळविले आहे.

बहुजनांनो संविधान वाचविण्यासाठी पाहारेकरी व्हा

पत्रकार नवीन कुमार यांचे आवाहन, गोंदियात डॉ आंबेडकर जयंती उत्साहात

गोंदिया :- जगात भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ आहे. आम्ही भारतीय संविधानाची प्रार्थना करतो, लोकशाहीची पूजा करतो आणि संविधान निर्माता डॉ बाबासाहेब आंबेडकरांना वंदन करतो ही आमची विचार सरणी आहे. ही विचारसरणी मणात बाळगून बहुजनांनो संविधान वाचविण्यासाठी पाहारेकरी व्हा असे आवाहन यु ट्यूब चॅनेल आर्टिकल १९ चे संपादक नविन कुमार यांनी (ता.१४) केले.

येथील सुभाष शाळेच्या मैदानावर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या १३३ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गेंदलाल तिरपुडे हे होते. मंचावर राज्यसभा ढत चे माजी निदेशक उर्मिल उर्मिलेश, विविध समाजातील सत्कारमुर्ती सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना नवीणकुमार म्हणाले की, महिलांच्या कल्यानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत हिंदू कोडबील आणलं. परंतु महिलांना संपत्तीचा अधिकार मिळेल, त्यांना सोडचिठ्ठी देण्याचा अधिकार राहील त्यामुळे एक संकट उभे राहील अशी विचारसरणी बाळगून मनुस्मृतीच्या हस्तकांनी याला विरोध केला, असे सांगून मणिपूरची घटना हे असेच षडयंत्र आहे असे ते म्हणाले. त्यांनी शिक्षणाच्या खाजगीकरनावरजोरदार ह

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात नवीन वाघीण दाखल

व्याघ्र संवर्धन स्थांनातरण दुसरा टप्पा

गोंदिया : वाघाचे संवर्धन स्थानांतरणाच्या उपक्रमाअंतर्गत नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात एकुण ४ ते ५ मादा वाघीर्णीना नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात स्थानांतरीत करणे प्रस्तावित होते. पहिल्या टप्यात २० मे २०२३ रोजी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा अभयारण्याच्या गाभा क्षेत्रात २ वाघीर्णीना निसर्गमुक्त करण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात ११ एप्रिल रोजी एका मादा वाघीणीला (छढ-३) नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा अभयारण्याच्या गाभा क्षेत्रात निसर्गमुक्त करण्यात आले आहे.परंतु त्या वाघिणीचे कॉलर निघाल्याने तिचा शोघ घेत पुन्हा १५ एप्रिल रोजी कॉलरआयडी लावून निसर्गमुक्त करण्यात आले.

डॉ. जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर व नंदकिशोर काळे, उपसंचालक, (कोअर) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर यांचे नेतृत्वाखाली १० एप्रिल २०२४ रोजी एक मादा वाघीण ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रा-तून ताडोबा व्याघ्र प्रकल्पाची चमूचे सहाय्याने ट्राक्युलाइज करून जेरबंद करण्यात आली. जेरबंद वाघीणीची वैद्यकीय तपासणी करुन सनियंत्रणकरीता १० एप्रिल २०२४ रोजी डॉ. रविकांत खोब्रागडे, पशु वैद्यकिय अधिकारी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प व त्यांची चमू तसेच भारतीय वन्यजीव संस्थानाचे कनिष्ठ संशोधकांचे सहकार्याने सॅटेलाईट जी.पी.एस. कॉलर बसविण्यात आली. सदरहू वाघीणीला पशुवैद्यकिय तपासणी करुन ११ एप्रिल २०२४ रोजी विशेष वाहनाने नागझिरा वन्यजीव अभयारण्य येथे आणण्यात आले. ११ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी डॉ. प्रविण चव्हाण, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व नागपूर यांचे हस्ते सदर मादा वाघीणीला (NT-३) नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा अभयारण्याच्या गाभा क्षेत्रात निसर्गमुक्त करण्यात आले.

वाघाचे स्थानांतरण उपक्रम माहिप गुप्ता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, डॉ. जितेंद्र रामगावकर मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर, जयरामेगौडा आर. उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली होत असून सदरहू कार्यक्रमात प्रमोदकुमार पंचभाई उपवनसंरक्षक, वन विभाग गोंदिया तथा क्षेत्रसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया (अतिरिक्त कार्यभार), राहूल गवई उपवनसंरक्षक, वन विभाग भंडारा, नंदकिशोर काळे उपसंचालक (कोअर) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर, पवन जेफ उपसंचालक नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र साकोली, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया व भंडारा जिल्हा, पशुवैद्यकिय अधिकारी व जलद बचाव दल) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, भारतीय वन्यजीव संस्थानाचे कनिष्ठ संशोधक, व्हीएचएफ चमू, विकास भोसले वनपरीक्षेत्र अधिकारी नागझिरा तसेच इतर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

वाघिर्णीना सोडल्यानंतर सॅटेलाईट जीपीएस कॉलर व व्हिएचएफ (S>atellite GPS> collar d VH$F) च्या सहाय्याने वाघिर्णीचे २४ ७ सक्रियपणे सनियंत्रण केले जाईल. संपूर्ण सनियंत्रणाचे कार्य हे कमांड आणि कंट्रोल रूम साकोली येथून नियंत्रीत केले जाणार आहे. या एक स्थलांतरीत वाघिर्णीच्या निरीक्षणानंतर व उर्वरित घटक लक्षात घेऊन इतर मादा वाघांना टप्प्या-टप्प्याने स्थानांतरीत केले जाईल. अशी माहिती उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

रब्बीतील धान खरेदी संकटात

३२ लाख क्विंटल धान गोदामात पडून, भरडाई थांबल्याने संस्था अडचणीत

गोंदिया: एकीकडे हमीभावाने धान खरेदी करणाऱ्या सबएजंट सेवा सहकारी संस्थांच्या अटी शासनाने अद्याप मंजूर केलेल्या नाहीत. तर दुसरीकडे राईस मिलर्सच्या मागण्याही प्रलंबित आहेत. त्यामुळे राईस मिलर्सनी धान भरडाई करण्यास नकार दिला. परिणामी खरीप हंगामात खरेदी करण्यात आलेले धान अद्यापही गोदामातच पडून आहेत. आता रब्बी हंगामातील धान महिन-दीड महिन्यात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे धान खरेदी संकटात आली असून गोदामात असलेल्या धानाची तुटदेखील संस्थाच्या अंगलट येणार आहे.

केंद्र शासनाचे भारतीय खाद्य निगम, नवी दिल्ली विभाग सर्व राज्यातील शेतकऱ्यांना धान उत्पादनाचा मोबदला पदरी पडावा. म्हणून किमान आधारभूत किंमत खरेदी योजना राबवित आहे. राज्य शासन धान उत्पादन जिल्ह्यात महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळांना नोडल एजंट नियुक्त करुन योजना २०००-२००१ पासून खरेदी सुरु केली आहे. गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व कोकण विभागातील धान उत्पादक जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशनने खरेदी-विक्री सहकारी संस्था को-ऑपरेटिव्ह राईस मिल सहकारी संस्था तसेच इतर सहकारी संस्थांना सबएजंट नियुक्त करुन त्यांच्याद्वारे धान खरेदी केली जात आहे. राज्य शासनाने खरीप हंगाम २०२३-२४ ची धान खरेदी संस्थांनी फेडरेशन व महामंडळाच्या आदेशानुसार नोव्हेंबपासून सुरु केली. फेडरेशन व महामंडळाने संस्थांना दोन महिन्यात मालाची उचल करण्यात येईल. असे खरेदी सुरु असताना संस्थांना आश्वास्त केले होते. या हंगामात जवळपास अधिकतम खरेदी डिसेंबर तर थोडीफार जानेवारी महिन्यात झाली. धान खरेदीला चार महिने झाले असताना गोंदिया जिल्ह्यातील सीमएआरसाठी मालाची उचल सुरु झालेली नाही. खरेदी वेळी १७ टक्के ओलावा असलेला धान खरेदी करण्यात आला. मिलर्ससोबत मिलींग करारनामा झालेला नाही. त्यामुळे संस्थांनी खरेदी केलेल्या धानाची डीओद्वारे उचलवेळी घट चार टक्क्यांवर येणार आहे. संस्थांचे कमिशन, हमाली रक्कम व गोदाम भाडे हे घटीच्या रकमेतच जमा होणार असल्याने संस्था चालवायची कशी? असा सवाल आता संस्थापुढे निर्माण झला आहे. जिल्ह्यात २४ लाख ७७ हजार क्विंटल फेडरेशन व महामंडळाची ७ लाख ५० हजार क्विंटल खरेदी झाली. परंतु अद्यापही जिल्ह्यातील धान उचलचा मुहूर्त निघाला नाही. त्यामुळे रब्बी हंगामातील धान खरेदी संकटात येणार आहे.

तो तोटा अद्यापही संस्थांच्या जिव्हारी

२००९-१० व २०१०-११ ला खरेदी धान उचल न करता मिलर्सकडून शासनाने लेखी पद्धतीने तांदूळ खरेदी केला होता. या दोन्ही हंगामातील धान हंगाम २०११-१२ मध्ये उचल केल्यामुळे त्यावेळी काम करणाऱ्या फेडरेशनच्या अ वर्ग संस्थावर मोठ्या प्रमाणात घटीची रक्कम फेडरेशन व महामंडळाने संस्थेच्या नावे टाकून कमिशनमधून सहा ते सात वर्षापर्यंत वसुली केली होती. तसेच हंगाम २०२०-२१ व २१२१-२२ मध्ये धानाची उचल त्याच हंगामात माहे मे व जून महिन्यात सुरु करण्यात आली. विदर्भातील तापमान ४६ अंशापर्यंत जाते. त्यामुळे या दोन्ही हंगामात गोदामातल धानात घट अधिक झाली. योजनत काम करणाऱ्या अ व ब वर्ग संस्थावर घटीची वसुली दीडपटीने केल्याने काही संस्थांची हमाली व गोदाम भाड्याची रक्कम घटीमध्ये वर्ग करण्यात आली. त्यामुळे दोन्ही हंगामात संस्थांना मोठा आर्थिक बोझा सहन करावा लागला होता.

शेतकऱ्यांचा संस्थाकडे तगादा

रब्बी हंगामातील धान मे महिन्यात खरेदी करावा लागतो. खरीप हंगामात खरेदी केलेल्या धानाची उचल झाली नाही. परत मका लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली. संस्थांचा रब्बी धान खरेदी व मक्का खरेदीसाठी शेतकरी संस्थांकडे नोंदणी व खरेदीसाठी आतापासूनच विचारपूस करु लागले आहेत. या सर्व प्रकरणाकडे शासन, फेडरेशन, महामंडळ व लोकप्रतिनिधी त्वरित हा तिढा सोडवून योग्य मार्ग काढण्याची मागणी या योजनेत काम करणाऱ्या विभागीय धान खरेदी संस्थांची आहे.

"१०८" रुग्णवाहिका ठरली १८१५०१ रुग्णांची जीवनदायिनी

१८१५०१ रुग्णांनी घेतला लाभ

जिल्ह्यात १५ रुग्णवाहिकांद्वारे वैद्यकीय सेवा

या योजनेंतर्गत जिल्ह्यात १५ अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका कार्यरत आहेत. या रुग्णवाहिका सध्या के.टि.एस. सामान्य जिल्हा रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा, ग्रामीण रुग्णालय देवरी, ग्रामीण रुग्णालय आमगाव, ग्रामीण रुग्णालय सडक अर्जुनी, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव, ग्रामीण रुग्णालय नवेगाव बांध, ग्रामीण रुग्णालय गोरेगाव, ग्रामीण रुग्णालय सौंदड, ग्रामीण रुग्णालय चिचगड, ग्रामीण रुग्णालय सालेकसा, ग्रामीण रुग्णालय रजेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी, प्राथमिक आरोग्य केंद्र डव्वा या ठिकाणी रुग्णवाहिका कार्यरत आहेत.

गोंदिया : आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा जलद मिळावी, यासाठी गोंदिया जिल्ह्यासाठी आरोग्य विभागाने १ मार्च २०१४ पासुन सुरू केली. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने १ मार्च २०१४ पासुन जिल्ह्यात "१०८" या आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरु झाली असुन आता पर्यंत १ लाख ८१ हजार ५०१ रुग्णांनी लाभ घेण्यात आलेला आहे. अगदी मोफत पद्धतीने दिल्या जाणाऱ्या सेवेमुळे अपघातग्रस्त, बाळंतपणासाठी अडलेल्या महिला, विषबाधेसह इतर सर्वच प्रकारची वैद्यकीय मदत नागरिकांना वेळेत पोहोचू शकल्याने अनेकांना नवजीवन देण्याचे काम त्यामुळे साध्य झाले आहे.

१०८ क्रमांकावर कॉल केल्यास अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज असलेली ॲम्ब्युलन्स पेशंटच्या सेवेसाठी सुवर्णकाळात हजर होत आहे. ॲम्ब्युलन्सम धील मशीनरीच्या सहाय्याने गोल्डन अवर्समध्ये पेशंटना हॉस्पिटलमध्ये भरती करण्यापूर्वी आवश्यक उपचार मिळतात. त्यामुळे घटनास्थळापासून हॉस्पिटलपर्यंत पेशंटना स्वस्थता लाभत आहे. जीपीआरएस प्रणालीमुळे कॉल आल्यास संबंधित डॉक्टरांना कळवून ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल होत असल्याचे जिल्हा समन्वयक स्वाती पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने जिल्ह्यात १५ रुग्णवाहिका कार्यरत असून सकाळ आणि रात्र सत्रांत वाहनचालक व वैद्यकीय अधिकारी त्यासाठी आरोग्य सेवा देत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी दिली आहे. या सेवेचा दळणवळणासाठी जिकिरीच्या ठरणाऱ्या व अतिदुर्गम भागांमधील नागरिकांसह तालुका आणि शहरी भागातील नागरिकांसाठी ही सेवा मोफ्फत असते. वैद्यकीय तातडीच्या वेळी १०८ क्रमांक डायल करून रुग्णवाहिकेची मदत घेता येते. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालय अशा वेगवेगळ्या ठिकाणी या रुग्णवाहिका उपलब्ध असतात. फोन कॉल झाल्यानंतर कमीत कमी वेळेत रुग्णवाहिका रुग्णापर्यंत पोहोचते. या सेवेबाबत जिल्ह्यात जनजागृती होत असून, वापरही वाढत आहे. १ मार्च २०१४ पासुन वेगवेगळ्या कारणांनी तब्बल १८१५०१ रुग्णांनी १०८ क्रमांक डायल करून रुग्णवाहिकेचा वापर केलेला आहे.

याबाबत बोलताना सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे यांनी सांगितले, की या सेवेबाबत जनजागृती होत असून, कॉल्सचे प्रमाण वाढत आहे. वेळेत उपचार मिळाल्याने रुग्णांचा जीव वाचतो. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या मदतीने आगामी काळात ही सेवा आणखी भक्कम आणि अचूक करण्यासाठी उपाययोजना हाती घेण्यात येतील. जास्तीत जास्त लोकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.वाघमारे यांनी केले आहे. रस्ता अपघात किंवा इतर कुठला अपघात, आग लागून कुणी भाजले, अचानक हृदयविकाराचा झटका आला किंवा एखाद्या महिलेला प्रसूती कळा सुरू झाल्यावर "१०८" डायल कर ना भाऊ, असेच अनेकांच्या मुखातून बाहेर पडते. एकूणच आपत्कालीन परिस्थितीत अनेकांना डायल १०८ रुग्णवाहिका सेवेची आठवण येत असून, आता पर्यंत जिल्ह्यात तब्बल १८१५०१ गरजूंनी आरोग्य विभागाच्या आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेचा लाभ घेतला आहे.





केंद्रात सत्ता येताच शेतकऱ्यांना कर्ज माफी करू

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची ग्यारंटी, ग्री वीर रद्द करू, महिलांना एक लक्ष रुपये वर्षाला देऊ

सेंदुरवाफा : भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचारासाठी १३ एप्रिल रोजी साकोली तालुक्यातील सेंदुरवाफा या ठिकाणी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची सभा पार पडली. या सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, केंद्रात आमची सत्ता येताच शेतकऱ्यांची कर्जमाफी करू, अग्नीवीर भरती बंद करून कायम स्वरूपी नोकऱ्या देऊ, गरीब लोकांची यादी काढून प्रत्येक कुटूंबातील एका महिलेला वर्षाला एक लाख रुपये म्हणजे महिन्याला ८५०० रुपये देऊ, अश्या २५ योजनांची ग्यारंटी आम्ही देत आहोत, तर हा घोषण पत्र बंद रुममध्ये तयार केला नाही तर, हजारो लोकांना विचारून हा घोषणा पत्र तयार करण्यात आले, असे काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी म्हणाले.

आमची सरकार येताच आम्ही सर्वात प्रथम ओबीसींसह सर्वांचीच जातनिहाय जनगणना करण्यासोबतच आरक्षणाची ५० टक्केची असलेली मर्यादा हटविण्याचा निर्णय घेतला आहे. देशाच्या प्रथम व्यक्ती असलेल्या राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मू या आदिवासी समाजातील असल्यामुळेच त्यांना राममंदिराच्या शुभारंभप्रसंगी निमंत्रित करण्यात आले नाही. कारण त्या आदिवासी समाजाच्या आहेत, फक्त धर्माच्या नावावर जनतेल भ्रमित करण्याचे काम केंद्रातील सरकार करीत आहे. आम्ही जो घोषणापत्र तयार केला,तो बंद कमऱ्यात नव्हे तर देशातील हजारो लोकांकडून, शेतकरी,कामगार, महिलांसोबत चर्चा करुन तयार करण्यात आलेला आहे. हा काँग्रेस पक्षाचा

घोषणापत्र नसून तो जनतेचा घोषणापत्र असून आपल्या मनातील गोष्ट आम्ही येथे लिहून ठेवल्याचा उल्लेख राहुल गांधी यांनी केले.

तर या सभेला महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे, आमदार सहसराम कोरोटे, आमदार अभिजित वंजारी, भंडारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई, गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दिलीप बंसोड, काँग्रेस नेते माजी मंत्री सतीश चतुर्वेदी, माजी खासदार मधुकर कुकडे, माजी खासदार डॉ.खुशालचंद्र बोपचे यांच्या सह महाविकास आघाडीतील अनेक नेते उपस्थित होते. तर काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या सभेला भंडारा आणि गोंदिया लोकसभा क्षेत्रातील जवळपास लाखोंच्या संख्येनी नागरिकांनी हजेरी लावली होती. यामुळे मोठा जनसमुदाय पहायला मिळाला हे विशेष.

लोकसभेच्या गणितावर ठरणार विधानसभेची समीकरणे

भंडारा-गोंदिया मतदारसंघ, गुणवत्तायादीत उत्तीर्ण होण्यासाठी आमदारांची धडपड

गोंदिया: सन २०१९ मधील निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेसकडून जागा खेचून आणली. त्यानंतर आता परत आपली जागा कायम ठेवण्यासाठी भाजपला पुरेपूर जोर लावावा लागणार आहे. तर लोकसभा निवडणुकीत मिळविलेले यश विधानसभा मतदारसंघातील वर्चस्व कायम ठेवण्यासाठी भाजपला लाभदायी ठरणार आहे. यामुळेच लोकसभेच्या गणितावर विधानसभेचे समीकरण ठरणार आहे.



भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात तुमसर, भंडारा, साकोली, अर्जुनी मोरगाव, तिरोडा व गोंदिया या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. सन २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत भाजप दोन, काँग्रेस एक अपक्ष दोन व राष्ट्रवादीने एक जागा मिळविली होती. तर २०१४ मध्ये मोदी लाटेत भाजपने सहापैकी पाच जागांवर विधानसभा मतदारसंघावर यश खेचून आणले होते. मात्र, २०१९ मध्ये त्यांना नुकसान सहन करावे लागले. गोंदिया व भंडारा या जिल्हा मुख्यालयामध्ये अपक्ष उमेदवारांनी विजयश्री खेचून नेली तर अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाची जागा राष्ट्रवादीने काबीज केली.

सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रफुल्ल पटेल विजयी झाले होते. तर २०१४ च्या निवडणुकीत भाजपच्या तिकीटावरुन नाना पटोले लोकसभेत पोहोचले. मात्र त्यानंतर त्यांनी राजीनामा दिल्याने लोकसभेची पोटनिवडणूक झाली. २०१८ मधील पोटनिवडणूकीत राष्ट्रवादीने ही जागा खेचून आणण्यात यश मिळविले. मात्र २०१९ मध्ये भाजपने परत जागा खेचून घेतली असून आता २०२४ च्या निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढत होत आहे.

दोन्ही पक्ष विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. यात आमदारांनाही आपली प्रतिष्ठा पणाला लावल्याचे मतदारसंघात दिसत आहे.

डबल इंजिन धावणार का?

काँग्रेसचा बालेकिल्ला तरी पाच वर्षात बदलले समीकरण

गोंदिया: अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी महायुतीत सहभागी झाले असून माजी आ. गोपालदास अग्रवाल हे सुद्धा भाजपध्येच आहेत. त्यामुळे आजी-माजी आमदारांचे डबल इंजिन धावून महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांचा मार्ग सुकर करणार का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

गोंदिया विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघावर सर्वाधिक सलग १५ वर्ष काँग्रेसने वर्चस्व स्थापन केले होते. हा विक्रम अद्याप कुणी मोडलेला नाही. तर मागील निवडणुकीत अपक्ष उमेदवार विनोद अग्रवाल यांनी भाजपचे उमेदवार गोपदलास अग्रवाल यांचा पराभव करत हा गड भेदून नवीन समीकरण तयार केले होते.

या विधानसभा क्षेत्रात गोंदिया शहरासह ग्रामीण भागाचा समावेश आहे. हा मतदारसंघ सुरुवातीवपासून काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग आहे. याची मदत दर निवडणुकीत काँग्रेसला मिळाली होती. मात्र सन २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसने एकदम नवखा उमेदवार दिल्याने सर्वात कमी मताधिक्य या उमेदवाराला मिळाले होते. तर काँग्रेस सोडून भाजपामध्ये गेलेले माजी आ. गोपालदास अग्रवाल यांना भाजपाने उमेदवारी दिली. त्यांच्याविरुद्ध अपक्ष म्हणून विनोद अग्रवाल यांनी दंड थोपटले होते.

काँग्रेसचा परंपरागत मतदारसंघ असल्याने या मतदारसंघात भाजप विरुद्ध काँग्रेस असा सामना रंगेल. अशी चर्चा होती. पण विनोद अग्रवाल यांनी चाबी संघटनेच्य माध्यमातून या मतदारसंघात मोर्चेबांधणी करुन काँग्रेसचा हा बालेकिल्ला भेदला तर भाजपाचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांचा २७ हजार मतांनी पराभव केला. त्यामुळे मागील २५ वर्षात प्रथमच या मतदारसंथाचे नेतूत्व अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडे आले.

आ. विनोद अग्रवाल यांनी महायुतीला समर्थन दिले आहे. तर माजी आ. गोपालदास अग्रवाल हे सुद्धा भाजपमध्ये आहेत. त्यांचीसुद्धा या मतदारसंथावर चांगली पकड आहे. त्यामुळे आजी-माजी आमदारांचे डबल इंजिन बळ महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांची नौका पार करण्यास मदतगार ठरेल का? अशी चर्चा राजकीय वर्तूळात आहे.

२०१९ विधानसभा निवडणुकीत उमेदवारनिहाय मिळालेली मते

विनोद अग्रवाल-	अपक्ष-१०२९९६
गोपालदास अग्रवाल-	भाजपा-७५८२७
अमर वऱ्हाडे-काँग्रेस-	७९३८
दुर्वास भोयर-बसपा-	४७०४
जनार्धन बनकर वंचित-	३८१०
नोटा-१८५७	

सन २०१९ लोकसभा निवडणुकीत या विधानसभा क्षेत्रात उमेदवारनिहाय मिळालेली मते

सुनील मेंढे-	भाजप-११२१२३
नाना पंचबुद्धे-	राष्ट्रवादी काँग्रेस-७३६९७
विजया नांदुरकर-	बसपा-९२३२
एस.व्ही.नान्हे-	वंचित-३७८८
नोटा-	१८६५

पटोले वळवणार का पारंपरिक मते

गोंदिया विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा गड आहे. या मतदारसंघात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग आहे. तर या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचाराची सर्व सुत्रे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्वत:कडे ठेवली आहेत. ते हा मतदारसंघसुद्धा पालथा घालत आहेत. त्यामुळे ते ता मतदारसंघातील काँग्रेसची पारंपरिक पते पडोळे यांना मिळवून देण्यात यशस्वी होतील का? हे पाहणेदेखील निर्णायक ठरणार आहे.

लोकशाही बळकटीकरणासाठी सायकल व बाईक रॅलीद्वारे मतदान जनजागृती

गोंदिया : देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. निवडणूक प्रणालीत मतदार हा राजा आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत जिल्ह्यातील १८ वर्षावरील सर्व नागरिकांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावून जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवून लोकशाही बळकटीकरणासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

गोंदिया येथील जयस्तंभ चौकात आज सायकल व बाईक रॅलीच्या माध्यमातून मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. महेंद्र गजभिये व शिखा पिपलेवार, तहसिलदार समशेर पठाण यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पहिल्या टप्प्यात भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ जूनला भंडारा येथे मतमोजणी होणार आहे. सन २०१९ मध्ये झालेल्या निवडणूकीत गोंदिया जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी ६७ टक्के होती. या निवडणूकीत जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी ८५ टक्केच्या वर नेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून प्रत्येक नागरिकांनी मतदान करण्यासाठी आज गोंदिया शहरात सायकल व बाईक रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे असे सांगून ते पुढे म्हणाले, मतदानाचा अधिकार हा कोणत्याही लोकशाही समाजातील मुलभूत अधिकार आहे. हा आपल्या लोकशाहीचा खरा आधारस्तंभ आहे. मतदान करणे हा केवळ अधिकारच नाही, तर ती आपली जबाबदारी आणि कर्तव्य सुद्धा आहे. त्यामुळे लोकशाही बळकट करण्यासाठी जिल्ह्यातील १८ वर्ष पूर्ण केलेल्या सर्व मतदारांनी उत्साहात मतदान करुन जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सदर सायकल रॅली गोंदिया येथील मनोहर चौक येथून निघून जयस्तंभ चौक-गांधी चौक-चांदणी चौक-भवानी चौक-दुर्गा चौक, गोरेलाल चौक-नेहरु चौक अशी मार्गक्रमण करुन जयस्तंभ चौक येथे संपन्न झाली. तसेच बाईक रॅली जयस्तंभ चौक येथून निघून उड्डाण पूल-विश्राम गृह-पाल चौक-एनएमडी कॉलेज-गायत्री मंदिर-अवंती चौक-बालाघाट रोड-टी पाईंट-बस स्थानक-उड्डाण पूल अशी मार्गक्रमण करुन जयस्तंभ चौक येथे संपन्न झाली.

मतदानाच्या दोन दिवसापूर्वी पासून दारु दुकाने बंद

गोंदिया : भारत निर्वाचन आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी निवडणूक होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. सदर निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्री मनाई/ कोरडा दिवस जाहीर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ चे नियम २६ (सी) (१) व मुंबई विदेशी मद्य (रोखीने विक्री, विक्रीच्या नोंदवह्या इत्यादी) नियमावली १९६९ चे नियम ९ ए (२) (सी) (१) मधील तरतुदींनुसार गोंदिया जिल्ह्यातील ठोक व किरकोळ देशी/ विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश पारीत केले आहे. त्यानुसार १७ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून पुढे (मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर), १८ एप्रिल २०२४ रोजी मतदानाच्या पूर्वीचा संपूर्ण दिवस, १९ एप्रिल २०२४ रोजी मतदानाचा संपूर्ण दिवस व ४ जून २०२४ रोजी मतमोजणीचा संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद ठेवावी. सदर आदेशाचे उल्लंघन करुन मद्यविक्री करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

जिल्ह्यात ६ लाख ७१ हजार मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप

जिल्हा प्रशासनाचा घरोघरी पोहचण्याचा प्रयत्न

गोंदिया : ११ भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होणार असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ८५ टक्क्याच्या वर वाढविण्याचे ध्येय जिल्हा प्रशासनाने ठेवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून ङ्गमतदार माहिती चिठ्ठीफ्चे वाटप जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. जिल्ह्यात एकूण १० लाख ९२ हजार ५४६ मतदार असून आतापर्यंत ६ लाख ७१ हजार ५८२ मतदारांपर्यंत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ङ्गमतदार माहिती चिठ्ठीफ पोहचविण्यात आलेली आहे. सर्व मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठी (वोटर स्लिप) पोहोचविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. नायर यांनी नुकताच आढावा घेऊन सूचना दिल्या. श्री. नायर म्हणाले, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बी.एल.ओ. माफर्फत मतदार माहिती चिठ्ठी लोकांपर्यंत पोहचल्या पाहिजे. ज्या क्षेत्रात मतदार माहिती चिठ्ठ्यांचे वाटप होते, त्या क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढण्याची शक्यता असते. कारण आपले नाव मतदार यादीत आहे, याबाबत नागरिकांना खात्री होते. त्यामुळे मतदार माहिती चिठ्ठीचे नियमीत वाटप करा. अधिकाऱ्यांनी सुध्दा क्रॉस चेकिंग करून मतदारांपर्यंत माहिती चिठ्ठी पोहोचले किंवा नाही याची खातरजमा करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

विधानसभा मतदारसंघ निहाय ङ्गमतदार माहिती चिठ्ठीफ्चे वाटप : जिल्ह्यात आतापर्यंत ६ लाख ७१ हजार ५८२ मतदारांपर्यंत मतदार चिठ्ठ्या पोहचविण्यात आलेल्या असून यात ६३-अर्जुनी मोरगाव मतदारसंघात १ लाख ५७ हजार ४४४. ६४-तिरोडा मतदारसंघात २ लाख ६ हजार ९००. ६५-गोंदिया मतदारसंघात १ लाख ९६ हजार ६९०, तर ६६-आमगाव विधानसभा मतदारसंघात १ लाख १० हजार ५४८ मतदारांचा समावेश आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून आता बी.एल.ओ. माफर्फत घरोघरी मतदार माहिती चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात येत आहे. उर्वरीत ४ लाख २० हजार ९६४ मतदार माहिती चिठ्ठी १६ एप्रिल पर्यंत वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

जिल्ह्यातील ४३ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिलांच्या हाती

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

गोंदिया : लोकशाही प्रणाली देशात मतदानाचा मुलभूत अधिकार १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकाला आहे. मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असतांना सुध्दा कित्येक महिला पुरुषांच्या गर्दीत जाण्याचे टाळत आपला मतदानाचा हक्क बजावत नाही. शासन व प्रशासनाकडून प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजवावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महिलांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील ४३ मतदान केंद्रांचे नियंत्रण पूर्णपणे महिलांच्या हाती देण्यात आले आहे. अर्थातच येथील अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंत सर्व जबाबदारी महिला पार पाडणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम १६ मार्च २०२४ रोजी जाहीर झालेला असून ११-भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. आजची महिला ही पुरुषांपेक्षा कमी नसून त्यांच्या बरोबरीने काम करीत आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या जास्त असूनही प्रत्यक्ष मतदानात मात्र महिलांना मागे टाकून पुरुषांची टक्केवारी नेहमीच जास्त असल्याचे दिसून येते. पुरुषांच्या गर्दीत जाऊन मतदान करण्यापेक्षा घरीच रहावे हा विचार करुन कित्येक महिला राष्ट्रीय कर्तव्य बजावत नाही. एकीकडे जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी शासन व प्रशासनाकडून विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत, मात्र काही महिला आपला मतदानाचा हक्क बजावत नाही असे निदर्शनास आले आहे.

महिलांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे व त्यांच्या मनात असलेली शंका-कुशंका काढून टाकावी यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन भंडारा-गोंदिया लोकसभा मतदानसंघातील ४३ मतदान केंद्र महिलांच्या सुपूर्द केले आहे. म्हणजेच या मतदान केंद्रांच्या मतदान केंद्र अधिकाऱ्यांपासून ते त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांची सर्व जबाबदारी महिलाच सांभाळणार आहेत.

ज्या मतदान केंद्रात पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या जास्त आहे अशा ठिकाणी साधारणत: महिला मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी जास्तीत जास्त महिलांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजवावा हा या केंद्रांच्या निर्मितीमागील उद्देश आहे.

अशी आहेत महिला मतदान केंद्र :- ६३-अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघ : ९८-खजरी, ११२-वडेगाव/सडक, १२८-कोदामेडी, १३३-डुग्गीपार, १०७-बाम्हणी/सडक, २५७-निलज, २३९-झरपडा, २४५-तावशी, २५१-अर्जुनी मोरगाव, २६७ मालकनपूर. ६४-तिरोडा विधानसभा मतदारसंघ : ७२-तिरोडा, ७४-तिरोडा, ७८-तिरोडा, ८३-तिरोडा, ८५-तिरोडा, १२१-चुरडी, १९२-निमगाव, २५२-कुन्हाडी, २६२-कटंगी, २६५-गोरेगाव, २७५-हिरडामाली, २८५-घोटी. ६५-गोंदिया विधानसभा मतदारसंघ : ९३-पांढराबोडी कॉलेज टोली, ९४-पांढराबोडी कॉलेज टोली, २२५-गोंदिया, २२६-गोंदिया, २२७-गोंदिया, २२८-गोंदिया, २३२-गोंदिया, २३३- गोंदिया, २५७-गोंदिया, २५८-गोंदिया, २५९-गोंदिया. ६६-आमगाव विधानसभा मतदारसंघ : ५९-रिसामा, ७८-आमगाव, ८०-आमगाव, ८२-आमगाव, ८४-आमगाव, १७१-सालेकसा, २४१-देवरी, २४३-देवरी, २४७-देवरी, २४९-देवरी.

आपल्या देशाला एक सशक्त राष्ट्र बनविण्यासाठी सर्वांनी मतदान करणे गरजेचे आहे. जिल्हा प्रशासनाकडून मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात येत असली तरी प्रत्येक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मतदान करण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. मतदान करणे हा आपला मुलभूत अधिकार असून त्याची प्रत्यक्षरित्या अंमलबजावणी करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांनी सर्व कामे दूर सारुन १९ एप्रिल रोजी मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजावून जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्गात महिला मतदारांची संख्या अधिक

चार जिल्ह्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदार सर्वाधिक आहेत. रत्नागिरीची एकूण मतदार संख्या १३ लाख ०३ हजार ९३९असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३१ हजार ०१२ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ७२ हजार ९१६ इतकी आहे. नंदुरबारची एकूण मतदार संख्या १२ लाख ७६ हजार ९४१ असून यामध्ये १२ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३७ हजार ६०९ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ३९ हजार ३२० इतकी आहे. गोदिंया जिल्हयातही महिला मतदारांची संख्या जास्त आहे. गोंदियाची एकूण मतदार संख्या १० लाख ९२ हजार ५४६असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५ लाख ४१ हजार २७२ आहे तर महिला मतदारांची संख्या ५ लाख ५१ हजार २६४ इतकी आहे. सिंधुदुर्गची एकूण मतदार संख्या ६ लाख ६२ हजार ७४५असून यामध्ये १ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३ लाख ३० हजार ७१९ आहे तर महिला मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार ०२५ इतकी आहे.

अन् राष्ट्रवादीची जागा काँग्रेसने घेतली

२००४ पासून होता राष्ट्रवादीचा ताबा, महायुती झाल्याने काँग्रेस आली विरोधी पक्षात

गोंदिया: सन १९५१ पासून कधी सत्तेत तर कधी विरोधात असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला धक्का देत प्रफुल्ल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सन २००४ पासून कब्जा मिळविला.त्यानंतर भंडारा-गोंदिया विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस कधी सत्तेत तर कधी विरोधात राहत आली आहे. परिणामी काँग्रेसचा उम्मेवारच लोकसभेत उतरत नव्हता. मात्र, आता भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी (अजित पवार गट) एकत्र आल्याने २००४ पासून वनवासात असलेल्या काँग्रेसला आपली जागा परत मिळाली असून या निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस अशी लढत होत आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघात १९५१ पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचाचा बोलबाला होता. येथे मधमधात सत्तांतर झाले मात्र सत्तेत भारतीय जनता पक्ष असला तरी विरोधात काँग्रेस असायची. विशेष म्हणजे सन १९९१ ते १९९८ पर्यतचा कार्यकाळही तेव्हा काँग्रेस पक्षातून लढणाऱ्या प्रफुल्ल पटेल यांच्या नावावरच दिसून येतो. त्यानंतर १९९९ ची निवडणूक श्रीकांत जिचकार यांनी काँग्रेसच्या तिकीटावर लढविली त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर शरद पवार यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली व प्रफुल्ल पटेल त्यांच्यासोबत गेले. यानंतर भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघात काँग्रेसला ग्रहण लागले व भाजप विरोधात राष्ट्रवादी असे समीकरण सुरु झाले. सन २००४ मध्ये काँग्रेसच्य जागी राष्ट्रवादीच्या तिकीटावर प्रफुल्ल पटेल निवडणुकीत उतरले व तेव्हापासून राष्ट्रवादी कधी सत्तेत तर कधी विरोधात राहत आली आहे.

मात्र आता राष्ट्रवादीत फाटाफुट झाली असून अजित पवार गटासोबत प्रफुल्ल पटेल आले व महायुतीत भाजपसोबत त्यांनी हात मिळवणी केल्याने काँग्रेसचे ग्रहण सुटले असून परत एकदा काँग्रेसला आपली जागा परत मिळाली आहे. हेच कारण आहे की लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर टाकण्यात आलेल्या काँग्रेसचा उमेदवार आज लढताना दिसत आहे.

२१ वर्षाचा वनवास संपला

सन २००४ मध्ये राष्ट्रवादीने भाजप विरोधात येथे निवडणूक लढविली व तेव्हापासून काँग्रेसला वनवास मिळाला होता. यानंतर येथे भाजप विरोधात राष्ट्रवादी हेच समीकरण तयार झाले.

आता महायुतीची निर्मिती जिल्हा काँग्रेससाठी लाभाची दिसत आहे. कारण मागील २१ वर्षापासून रिंगणाच्या बाहेर असलेल्या काँग्रेसला आपला उमेदवार लढविता येत आहे.

मतदार संघात २००४ पासूनची स्थिती

सन	विजयी	पराभूत
२००४	भाजप	राष्ट्रवादी
२००९	राष्ट्रवादी	भाजप
२०१४	भाजप	राष्ट्रवादी
२०१८	राष्ट्रवादी	भाजप
२०१९	भाजप	राष्ट्रवादी
२०२४	भाजप विरुद्ध काँग्रेस	

मतदार संख्या सन् मतदानातही झाली वाढ

२०१४-एकूण मतदार १६,५५,८५२
झालेले मतदान-७२ टक्के
२०१९- एकूण मतदार-१८,११,५५६
झालेले मतदान-६८ टक्के
२०२४-एकूण मतदार-१८,२७,१८८